# पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण

| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक ०५.०१.२०१७<br>०१.०० |
|---|---|---|

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :—औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

यावद्रारे आपणास सुचिम करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक ०४.०१.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

**०१) पोस्टे फुलंब्री:—** गुरन । ०१/१७ कलम २७९ ३०४(अ) भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी सर तर्फे विजय दौलतराव जाधव वय २८ वर्ष व्यवसाय नौकरी पोउपनि पोस्टे फुलंब्री यांनी फिर्याद दिली की यातील मयत हरीदास काशीनाथ शेरकर वय ३२ वर्ष व्यवसाय चालक रा. फुलंब्री ता. फुलंब्री याने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर क्रं. एमएच २० एवाय ८९४६ व ट्रॉली नं. एमएच २० सीवाय १७३१ हे रिकामे ट्रॅक्टर वानेगाव शिवारात गिरजा नदीचे पुलावरून फुलंब्री कडे भरधाव वेगात हयगयीने व निष्काळजीपणे रोडची व पुलाची परिस्थीतीचा विचार न करता चालवुन ट्रॅक्टर पलटी झाल्याने स्वत: गंभीर जखमी होवुन स्वत:चे मरणास कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. जाधव पोउपनि पोस्टे फुलंब्री हे करीत आहे.

**दारू बंदी कार्यवाही :—**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात विविध पोस्टे ला ०३ गुन्हे मुंबई दारूबंदी कायदया प्रमाणे ०३ ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन ५००/—रू. किं. १८० मिलीच्या १० देशीदारू भिंगरी संत्राच्या बाटल्या तसेच ८०० ली. गावठी हातभट्टीची दारू बनविण्याचे गुळ नवसागर मिश्रीत रसायन किं. ४०,०००/—रू. चा माल मुद्येमाल असा जप्त करण्यात आला आहे.

**मुंबई जुगार कायदा:—**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात पोस्टे अजिंठा येथे ०१ गुन्हा मुंबई जुगार कायदया प्रमाणे ०१ ईसमा विरूध्द दाखल झाला असुन त्यांचे ताब्यातुन किं. ७४०/—रू. नगदी व जुगाराचे साहीत्य असा मुद्येमाल असा जप्त करण्यात आला आहे

**आकस्मात मृत्युः—**

**०१) पोस्टे वैजापुरः—** आ.मृ. नंबर ०१/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार एस.बी. घुगे सफौ नेमणुक घाटी चौकी औरंगाबाद यांनी खबरदिली की यातील मयत नामे कुसुम सुभाष शेलार वय ४० वर्ष रा. पालखेड ता. वैजापुर यांचे छातीत दुखत असल्याने व कावीळचे आजाराने उपचार दरम्यान मरण पावली वगैरे एमएलसी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास सफौ कटकुरी पोस्टे वैजापुर हे करीत आहे.

**०२) पोस्टे शिवुरः—** आ.मृ. नबर ०१/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार आर.आर. गायके पोह/२९९ नेमणुक घाटी चौकी औरंगाबाद यांनी खबर दिली की यातील मयत नामे संदीप नारायण येवलेकर वय ३५ वर्ष रा. अशोकस्तंभ जवळ नाशिक हे दिनांक ०३.०१.२०१७ रोजी २२.३०वा. दरम्यान तलवाडा गावाजवळ अपघातात जखमी झाल्याने सिएमओ सो. यांनी संदीप यास तपासुन दिनांक ०४.०१.२०१७ रोजी ०२.००वा. मयत घोषीत केले वगैरे एमएलसी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास सफौ जाधव पोस्टे शिवुर हे करीत आहे.

**स्वाक्षरीत**
**पोलीस अधिक्षक**
**औरंगाबाद ग्रामीण करीता**

**श्री सफौ चव्हाण नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण**